सन २०१७-१८, जलयुक्त शिवार अभियान लेखाशिर्ष ४४०२ २६८१, निधी वितरीत करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## जलसंधारण विभाग

**शासन निर्णय क्रमांकः जशिअ- २०१७/प्र.क्र. १९८/जल-७**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक : ६ नोव्हेंबर, २०१७**

वाचा :-

१. शासन निर्णय, जलसंधारण विभाग, क्रमांक: जशिअ-२०१४/प्र.क्र. २०३/जल-७, दिनांक ५ डिसेंबर, २०१४

२. शासन निर्णय, जलसंधारण विभाग, क्रमांक: जशिअ २०१६/प्र.क्र. २६६/ जल-७, दि. ३० डिसेंबर, २०१६

३. शासन निर्णय, जलसंधारण विभाग, क्रमांक: जशिअ-२०१६/प्र.क्र.५१८/जल-७, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ व दिनांक १४ मार्च , २०१७

४. शासन निर्णय, जलसंधारण विभाग, क्रमांक: जशिअ-२०१७/प्र.क्र.१९८/जल-७, दिनांक २७ एप्रिल, २०१७ व २२ मे, २०१७, दि.७ जून २०१७ व ७ जुलै, २०१७

५. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७

प्रस्तावना: -

राज्यात वारंवार उद्भवणा-या टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून जलयुक्त शिवार अभियान दि. ५ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सन २०१५-१६ मध्ये ६२०२ व सन २०१६-१७ मध्ये ५२९२ असे एकूण ११४९४ गावे निवडून कामे सुरु करण्यात आलेली आहेत. तसेच सन २०१७-१८ मध्ये ५००० गावे निवडून आराखडा तयार करून कामे सुरु करण्यात आलेली आहेत.

जलयुक्त शिवार योजनेसाठी ४४०२ २६८१ हे नवीन स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात आले असून सन २०१७-१८ करिता ₹ .१२००.०० कोटी निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. सदर निधीपैकी सन २०१६-१७ च्या गावांकरिता संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २७ एप्रिल २०१७ अन्वये रु.२००.०० कोटी निधी व दिनांक २२ मे, २०१७ अन्वये ₹ ५००.०० कोटी आणि सन २०१७-१८ च्या गावाकरिता दिनांक ७ जून, २०१७ अन्वये ₹ ४७५.०० कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक ७ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयान्वये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत प्रशिक्षणासाठी ₹ ४.५० लक्ष निधी वितरीत केलेला आहे.

सन २०१७-१८ मध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत निवडण्यात आलेल्या गावातील प्रतिनिधीचे प्रशिक्षण व त्यांना प्रशिक्षण देण्या-या संस्थांस प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले होते. सदर प्रशिक्षणाच्या खर्चाकरिता संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन पुणे यांनी ₹४६६.२९ लक्ष मागणी केलेली आहे त्यानुसार ₹ ४६६.२९ लक्ष (चार कोटी सहासष्ट लक्ष एकोणतीस हजार) वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>**:-

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१७-१८ करिता रु. १२००.०० कोटी (₹. बाराशे कोटी) निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. सदर निधीपैकी सन २०१६-१७ च्या गावांकरिता लेखानुदानाव्दारे प्राप्त रु.२००.०० कोटी निधी दिनांक २७ एप्रिल, २०१७, ₹५००.०० कोटी निधी दिनांक २२ मे २०१७ , व सन २०१७-१८ च्या गावाकरिता ₹ ४७५.०० कोटी निधी दिनांक ७ जून २०१७ च्या शासन निर्णायान्वये वितरीत करण्यात मान्यता दिलेली आहे.

२. संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन पुणे यांनी जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत निवडण्यात आलेल्या गावातील प्रतिनिधीचे प्रशिक्षण व त्यांना प्रशिक्षण देणा-या संस्थास प्रशिक्षण आयोजित केलेले होते.

३. प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणाचा एकुण खर्च ₹ ६.५४ लक्ष आलेला आहे त्यापैकी ₹४.५० लक्ष संदर्भाधीन दिनांक ७ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयान्वये दिलेला आहे आता उर्वरीत ₹ २.०४ लक्ष (दोन लक्ष चार हजार फक्त) निधी वितरीत करण्यास तसेच गाव पातळीवरील प्रशिक्षणासाठी संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन पुणे यांच्या मागणीनुसार ₹ ४६४.२५ लक्ष (चार कोटी चौसष्ट लक्ष पंचवीस हजार फक्त) वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयान्वये एकुण ₹४६६.२९ लक्ष (चार कोटी सहासष्ट लक्ष एकोणतीस हजार फक्त) वितरीत करण्यात येत आहे.

४. सदर निधी मागणी क्रमांक एल ७, ४४०२ मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च, ०० १०२ मृद संधारण, ०३ जलयुक्त शिवार अभियान, (०३ ) (०१) जलयुक्त शिवार अभियान (४४०२ २६८१ ), ५३ मोठी बांधकामे या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. सदर निधीकरीता संचालक मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. कोषागारातून आहरण व संवितरणकरीता सहायक संचालक (लेखा) कृषि आयुक्तालय पुणे व सर्व संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाचे लेखाधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी असे घोषित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधिन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ / प्र. क्र. ७५ /अर्थ- ३ दि.१८ एप्रिल, २०१७ अन्वये विभागास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१७११०६१६१७४०२२२६** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Karad

Digitally signed by Narayan Karad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RD and WCD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fc35aa8ffade5bb6105200693c60a32b755f7e67f72965b8dd57adaa570981f1, cn=Narayan Karad
Date: 2017.11.06 17:17:51 +05'30'

**( ना. श्री. कराड )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.सभापती विधान परिषद यांचे सचिव
३. मा.अध्यक्ष विधान सभा यांचे सचिव
४. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
५. मा.मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्यमंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
७. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८. मा. विरोधी पक्ष नेता विधानपरिषद व विधानसभा, विधान भवन, मुंबई
९. सर्व मा.विधान परिषद / विधान सभा सदस्य, विधान भवन, मुंबई
१०.मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव
११.सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय
१२.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३.आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, कृषि आयुक्तालय, पुणे
१४. आयुक्त, मृद व जलसंधारण, औरंगाबाद
१५.सर्व विभागीय आयुक्त
१६.संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे
१७.मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण),महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१९.सर्व अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ
२०.सर्व विभागीय कृषि सहसंचालक
२१.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

**२२.**महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता)
**२३.**सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण
**२४.**सर्व मुख्य वनसंरक्षक / सर्व उप वनसंरक्षक
**२५.**संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर
**२६.**सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
**२७.**सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२८. सर्व कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण)/जिल्हापरिषद
**२९.**सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
**३०.**महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर
**३१.**महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर
**३२.**सर्व मंत्रालयीन विभाग
**३३.**सर्व सहसचिव /उपसचिव /अवर सचिव,मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय
**३४.**कार्यासन जल-११ व कार्यासन जल-१९ जलसंधारण विभाग, मंत्रालय
**३५.**निवड नस्ती जल-७